


Title Code- MAHMAR-51647

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ

Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com

वर्ष ३ रे | अंक : ७९१. वा | सोमवार | दि. ०३ जून २०२४ | पृष्ठ ८ | किंमत ३ रुपये

# अनिर्बंध भ्रष्टाचारातून जिल्हा रुग्णालयात बोकाळले कुरघोडीचे राजकारण

# एखाद्याचा जीव घेण्यापर्यंत मजल, तर काहींच्या सुपाऱ्या ही दिल्याची चर्चा...

पोस्टमार्टम १६

**जनसंचलन/बुलढाणा**

येथील जिल्हा सामान्य रुग्णालयात गेल्या अनेक वर्षांपासून सातत्याने अनिर्बंध भ्रष्टाचार सुरू आहे. रुग्णालयातील बरेच अधिकारी आणि कर्मचारी या भ्रष्टाचारात सामिल आहे. भ्रष्टाचाराची हिस्सेवाटी खालपासून वरपर्यंत होते आहे. मात्र, या अनिर्बंध भ्रष्टाचारातील हिस्सेवाटीच्या मुद्द्यावरून अधिकारी-कर्मचाऱ्यांमध्ये आपसात कुरघोड्या, राजकारण प्रचंड बोकाळले आहे. त्यामुळेच सध्या एकमेकांविरोधात कथितरित्या सुपाऱ्या देणे, काहींना कथितरित्या जीवनातून उठवणे, तर काहींना अधिकाऱ्यांशी संगमनत करून शारीरिक व मानसिक त्रास देण्याचे प्रकार प्रचंड वाढलेले आहेत. जिल्हा रुग्णालयातील हे घाणेरडे राजकारण भविष्यात किती जणांचा बळी घेईल, हा प्रश्न सध्या जोरदार चर्चिला जात आहे. जिल्हा रुग्णालयात कोरोना महामारीच्या आधीपासूनच प्रचंड प्रमाणात करोडो रुपये साहित्य, उपकरणे भ्रष्टाचार सुरू आहे. कोरोना महामारी आली आणि जिल्हा रुग्णालय प्रशासनात भ्रष्टाचाराचा व्हायरस प्रचंड फैलावला. या व्हायरसची लागण जिल्हा रुग्णालयातील अनेक अधिकारी व कर्मचाऱ्यांना होऊ लागला. या प्रकारामुळे जिल्हा रुग्णालयात सामूहिक पद्धतीने भ्रष्टाचाराला चालना मिळाली. भ्रष्टाचारात सर्वांचाच हिस्सा ठरलेला असल्या कारणाने मग तेरी भी चूप, मेरी भी चूप अशा पद्धतीने भ्रष्टाचाराचे हे थैमान राजरोसपणे सुरू होते. असं म्हणतात की, मनुष्य हा भयंकर स्वार्थी प्राणी आहे. जिल्हा रुग्णालयातील काही अधिकारी व कर्मचाऱ्यांचे हे अति स्वार्थीपणच या ठिकाणी नडले आणि मग या भ्रष्टाचाराच्या मुद्द्यावरून मग अधिकारी व कर्मचाऱ्यांमध्ये प्रचंड कलगीतुरा माजायला लागला. त्याला हिस्सा जास्त मिळाला, मला का कमी मिळाला? या भावनेतून मग राजकारण आणि कुरघोड्यांनी कळस गाठला. एखादा अधिकारी जास्तच आपल्या भ्रष्टाचाराच्या मार्गात येत असेल, तर त्याला शारीरिक व मानसिक त्रास देणे, त्याच्या कामकाजात प्रचंड हस्तक्षेप करणे, अधिकाऱ्यांशी साटेलोटे करून भ्रष्टाचारातील वाटेकऱ्यांना बायपास करणे हे प्रकार सुरू झाले. कालांतराने हे प्रकार वाढले. मग ज्याला हिस्सा कमी मिळाला, तो भ्रष्टाचाराचा भंडाफोड करण्याच्या धमक्या देऊ लागला. मग अशा अधिकाऱ्याला प्रसंगी एखादा बनावट अपघात दाखवून त्याचा काटा काढण्याचा प्रकार देखील झाला असल्याची जोरदार चर्चा जिल्हा रुग्णालयात तोंडतोंडी व कानोकानी ऐकू येते. खरे तर या सर्व प्रकारांची चौकशी होणे गरजेचे आहे. परंतु आपल्या भ्रष्टाचाराच्या पैशातून सगळे काही मॅनेज करण्याची हातोटी असल्यामुळे जिल्हारुग्णालयातील या भ्रष्टाचाऱ्यांपर्यंत कायद्याचे हात पोहोचतच नाही, ही वस्तुस्थिती आहे. भ्रष्टाचाराच्या या मायेतून अनेक अधिकारी व कर्मचाऱ्यांनी स्वतःच्या प्रचंड बेनामी संपत्ती अपसंपदा गोळा केल्या केला आहेत. अनेक अधिकाऱ्यांच्या या बेनामी संपत्तीचे तपशील दैनिक जनसंचलन सिटी न्यूजकडे प्राप्त झालेले आहेत. त्याचा खुलासा आगामी काळात दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज करणार आहे. जिल्हा रुग्णालयातील हे भ्रष्टाचाराचे विकृत आणि विद्रुप चेहरे जनतेसमोर उघड करण्याचे काम दैनिक जनसंचलन नक्कीच करणार. एव्हढेच नाही तर या भ्रष्टाचारी अधिकाऱ्यांच्या करोडो रुपयांची बेनामी संपत्तीचा तपशील दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज आयकर विभागाकडे देणार आहे. सिटी न्यूज व दैनिक जनसंचलनच्या जागृतीमुळे आता अनेक सामाजिक संघटना, सामाजिक कार्यकर्ते या भ्रष्टाचाराच्या विरोधात आवाज उठवत असून, त्या सर्वांच्या पाठीशी दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज खंबीरपणे उभे आहे व भ्रष्टाचाराविरोधातील आपली लढाई दैनिक जनसंचलन आणखी मजबूत केल्या शिवाय राहणार नाही.

अजून बरेच काही पुढील भागात...

### भ्रष्टाचारी कंपूतूनच माहिती होतेय लीक

**विशेष म्हणजे ही सर्व माहिती जिल्हा रुग्णालयातील या भ्रष्टाचाऱ्याच्या कंपूतूनच लीक होत आहे. आता सर्वच जण एकमेकांच्या तंगड्या ओढण्याच्या कामात लागले आहेत. त्यातूनच मग काही जणांना खंडणीसाठी त्रास देणे, काही जणांच्या विरोधात पोलिस तक्रारी करणे, हे स्पष्ट झाले आहे. मात्र, जो जास्त त्रस्त झालेला आहे, तोच या भ्रष्टाचाराचा भंडाफोड करीत आहे. त्यामुळे या प्रकारातून या भ्रष्टाचारातील काय-काय बाहेर येईल, हे येत्या काळात आणखी स्पष्ट होणार आहे.**





---

## ४३ वर्षीय डॉक्टरने गळफास घेऊन केली आत्महत्या

**जनसंचलन/बुलढाणा**

**जिल्हा सामान्य रुग्णालयातील डॉक्टर** यांनी गळफास घेऊन केली आत्महत्या बुलढाणा शहरातून एक धक्कादायक बातमी समोर आली आहे. शहरातील सुंदरखेड भागातील काँग्रेसनगर तार कॉलनी परिसरात सत्यम अपार्टमेंट येथे राहणाऱ्या डॉक्टरने सायंकाळी दोरीच्या साह्याने गळफास घेऊन आत्महत्या केली. डॉक्टर पंकज सुभाष शिंगणे (४३ वर्ष) असे आत्महत्याग्रस्त डॉक्टरचे नाव आहे. डॉ. शिंगणे हे जिल्हा सामान्य रुग्णालयातील आयुर्वेद विभागात कार्यरत होते. सायंकाळी ७:३० वाजेच्या सुमारास ही घटना उघडकीस आली. डॉ. शिंगणे यांनी घरी कोणी नसताना गळफास लावला. दरम्यान, सायंकाळी नातेवाईकांनी दरवाजा उघडला तेव्हा हा धक्कादायक प्रकार उघडकीस आला. त्यांच्या पश्चात पत्नी एक मुलगा आणि एक मुलगी असा परिवार आहे. सरळ साध्या स्वभावाचे डॉक्टर म्हणून त्यांना सर्वजण ओळखत होते त्यांच्या मृत्यूच्या घटनेने अनेकांना धक्का बसला आहे . घटनेची माहिती मिळताच शहर पोलीस स्टेशनचे कर्मचारी घटनास्थळी दाखल होऊन



पंचनामा केला.सध्या डॉ.शिंगणे यांचे शव विच्छेदनाचे काम जिल्हा सामान्य रुग्णालयातील शवगृहात सुरू आहे.

## २४ वर्षीय विवाहितेचा विनयभंग

**जनसचंलन/ शेगाव**

येथील एसबीआय कॉलनीत भाड्याच्या खोलीत राहणाऱ्या २४ वर्षीय विवाहितेचा विनयभंग झाल्याची घटना ३१ मे रोजी रात्री १० वाजता घडली. याबाबत पिडीत विवाहितेने शहर पोलिसात तक्रार दिली की, आरोपी शैलेश महादेव काळे ह. मु. एसबीआय कॉलनी शेगाव याने मला रुमवर झोपयला ये अशा वाईट उद्देशाने इशारा केला. त्यानंतर माझे पती त्याला विचारण्यास गेले असता त्याने माझे पती यांना शिवीगाळ केली.आरोपी



शैलेश महादेव काळे व त्याचे सोबत त्याचा एक मित्र (नाव माहित नाही) त्या दोघांनी माझे पती यांना लोटपाट करून मारहाण केली व जीवे मारण्याची धमकी दिली. अशा रिपोर्टवरून आरोपी विरुध्द अप क्र. ३११/२०२४ कलम ३५४ अ, ५०४,५०६, ३४ भादंविनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# लालपरी (एसटी) ची ७६ वा वर्धापन दिन बुलडाणा बस्थानकावर मोठ्या उत्साहात साजरा

**जनसंचलन/बुलडाणा**


बुलडाणा बस्थानकावर बुलडाणा आगार प्रशासनाच्या वतीने लाल-परी (एसटी) चा १ जून २०२४ रोजी लालपरिला सुरू होऊन आज ७६ वर्ष पुर्ण झाले आहे आणि ती ७७ त्या वर्षात पदार्पण करीत आहे त्या एसटीच्या अविरत उनपाऊस याची पर्वा न करता प्रवाशांच्या सेवेसाठी, बहुजन हिताय बहुजन सुखाय हे ब्रीद वाक्य घेवून प्रवाशांची सेवा करीत या सेवेची दखल घेवून बुलडाणा आगार प्रशासनाने संपूर्ण बस्थानकावर विधीत रोशनाई, रांगोळी टाकून, संपूर्ण बसस्थानक स्वच्छ धुवून, संपूर्ण बस्थानकावर केळीचे खांब लाऊन व अंतरराजीय बुलडाणा ते सुरत बसची हार फुलांनी सजावट करून केक कापून यंत्र अभियंता चालन नितीन जैसवाल, विभागीय वाह-तूक अधिकारी मासकर, डेपो म्यानेजर भालेराव ह्यानी प्रवाशांची जीवन वा-हीनी, राप कर्मचाऱ्यांची अन्नदाता माय हीचा मोठ्या उत्साहात ७६ वाढदिवस, वर्धापन दिनाचे उद्घाटन करून साजरा केला व प्रवाशांना पेढे व पुष्प गुच्छ देवून स्वागत करण्यात आले. आगार व्यवस्थापक भालेराव यांनी राप महामंडळाला प्रगती साठी कामकरणाऱ्या प्रशासकीय, पर्यवेक्षकीय, यांत्रीकी, तसेच एसटीचा कणा ज्याला संभोदिले जाते त्या चालक, वाहक कर्मचाऱ्यांचे पुष्प गुच्छ देवून स्वागत करून प्रोत्साहीत करण्यात आले. यावेळी आगार व्यवस्थापक सुरेंद्र भालेराव यांनी प्रवाशांना लालपरी काय काय सुविधा देते याची माहिती दिली व एसटीचा प्रवास कसा सुखकर आहे व एसटीनेच प्रवास करावा असे आव्ह-ान केले. यावेळी राप कर्मचाऱ्यांनी लालपरिच्या वर्धापन दिनी शपथ घेतली की, लालपरिचे पूर्वीचे वैभव पुन्हा कसे निर्माण होईल, आशिया खंडात एक नंबर वर असलेली महाराष्ट्राची लालपरी पुन्हा एक नंबर कसा येईल, प्रवाशांची एसटी बद्दल सहानुभूती कसा वाढेल या साठी मनापासून प्रयत्न करू प्रव-ाशी हेच आमचे दैवत म्हणून वागू असी राप कर्मचाऱ्यांनी मनोमनी शपथ घेतली यावेळी स्थानक प्रमुख रामकृष्ण पवार,



वाहतूक निरिक्षक पद्माकर मगर, वा-हतूक नियंत्रक जितेंद्र साळवे, पयघन, किर्ती शेजोळ, प्रीती खिल्लारे, राजू आगाशे, वरिष्ठ लिपीक मंगला इंगळे, कार्यशाळा अधिक्षक धारपवार, प्रभारक आराख, कामगार सेनेचे संजय उबरहंडे, कास्ट्राईबचे भारत आराख, रवि अवसरमोल, दिपक मिसाळ, कामगार संघटनेचे राजेंद्र पवार, भाऊसाहेब सरदार, कास्ट्राईबचे कार्यध्यक्ष तथा पत्रकार बाबासाहेब जाधव, कामगार सेनेचे गजानन माने,लक्ष्मी बंड, प्रतिभा वानखडे, शिला जाधव, मिताली खरात, जोत्सना आराख ,भवटे लिपीक राहूल आराख, गोंधळी इत्यादी राप कर्मचारी व प्रवासी वर्ग हजर होता.

# जागेच्या कारणावरून दोन गटात तुफान हाणामारी

**जनसंचलन/ संग्रामपूर**



क्षुल्लक कारणावरून वाद विकोपाला गेल्याने दोन गटात हाणामारीची घटना पांचाळा खु, येथे २७ मे रोजी घडली. याप्रकरणी परस्परविरुद्ध तक्रारीवरून तामगाव पोलिस ठाण्यात ३१ मे रोजी रात्री ८ आरोपींविरुद्ध गुन्हे दाखल झाले. पांचाळा खु, येथील आशा स्वयंसेविका शारदा सुरेश बांगर यांनी तक्रार दिली. त्यात जागेच्या कारणावरून सुनील बांगर, प्रकाश बांगर, रमेश बांगर, रेश्मा बांगर, उषा बांगर, जयश्री बांगर यांनी जीवे मारण्याची धमकी देत चाकू मारून जखमी केल्याचे म्हंटले. त्यावरून ६ जणांविरोधात गुन्हा दाखल झाला. दरम्यान रेश्मा सुनील बांगर यांनीही तक्रार दिली. त्यामध्ये विजय प्रकाश लाहुडकर व शारदा सुरेश बांगर या दोन आरोपींनी संगनमत करून मारहाण करून जीवे मारण्याची धमकी दिल्याचे म्हटले. त्यावरून विजय प्रकाश लाहुडकर, शारदा सुरेश बांगर विरोधातही गुन्हा दाखल झाला आहे.

# समृद्धीवर डाळिंबाचा ट्रक उलटला चालक जखमी

**जनसंचलन/ डोणगाव**

अचानक ब्रेक मारणाऱ्या एका कारला वाचविण्याच्या प्रयत्नात समृद्धी महामार्गावर कोलकत्याकडे डाळिंब घेऊन जाणारा ट्रक उलटून अपघात झाला. यात ट्रक चालक किरकोळ जखमी झाला आहे. हा अपघात १ जूनला पहाटे साडेतीन वाजण्याच्या सुमारास घडला. नाशिक येथून कोलकात्याकडे डब्ल्यूबी-२३-एफ-६५३८ क्रमांकाचा ट्रक डाळिंब घेऊन जात होता. मेहकर तालुक्यातील डोणगाव जवळ शेलगाव देशमुख येथील अंडरपासनजीक एका छोट्या कारने वेगाने येऊन ट्रकला ओव्हर टेक केले आणि लगेच कार चालकाने ब्रेक दाबले. त्यामुळे ट्रक चालकाने कारला वाचविण्याचा प्रयत्न - केला. समृद्धी महामार्गावर अंडरपासच्या भिंतीला धडकून ट्रक असा रस्त्यावर उलटला. त्यात ट्रकमुळे बाजूचे कठडे तुटले व ट्रक अंडरपासच्या भिंतीवर धडकून उलटला. त्यात ट्रक चालक मोनू सिंग किरकोळ जखमी झाला आहे. पण, ट्रक जर अंडरपासची भिंत तोडून पुल-ाखाली पडला असता तर मोठी दुर्घटना झाली असती. समृद्धीवर आता पुन्हा अपघात वाढत आहेत. वृत्तलिहिपर्यंत या अपघात प्रकरणी डोणगाव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला नव्हता.

# महाराणा प्रतापसिंह यांच्या जयंतीनिमित्त व्याख्यानात डॉ ओमेन्द्रू रत्न यांची गर्जना

## बुलढाणा शहरात ओमकार लॉन्स वर महाराणा प्रतापसिंह यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी

**जनसंचलन/बुलढाणा**

बुलढाणा शहरातील ओमकार लॉन्स धाड नाका या ठिकाणी दि २ जून रोजी वीर शिरोमणी महाराणा प्रतापसिंह यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली आहे. विशेष या कार्यक्रमासाठी जयपुर राजस्थान येथील ईएनटी सर्जन डॉ ओमेन्द्रू यांच्या व्याख्यानाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. डॉक्टर यांनी महाराणा एक सहस्त्र वर्षाचे धर्मयुद्ध या विषयावर त्यांनी आपले विचार मांडले या विचारामुळे योग्य मार्गदर्शन त्या ठिकाणी मिळाले आहे. त्यानंतर त्यांनी हिंदू समाज ज्यामध्ये राजपूत ,भिल्ल, चारण व असे अनेक समूह सहभागी आहेत त्यांच्या अतुलनीय बलिदानाचा इतिहास हा सगळ्यांसमोर सांगितला. खरा इतिहास हिंदूपासून लपून ठेवल्याचा आरोपही सुद्धा त्यांनी यावेळी केला केंद्र सरकारने हिंदूंचा हजारो वर्षाचा धर्म रक्षणाचा इतिहास पुन्हा नव्याने अभ्यासक्रमात समाविष्ट करावा





अशी मागणी त्यांनी यावेळेस केली आहे काही व्हिडिओ माध्यमातून त्यांनी दाखवून दिले की पाकिस्तानात हिंदूवर होत असलेले अत्याचाराची माहिती सुद्धा त्यांनी दिली आहे. महाराणा प्रताप यांच्या प्रतिमेची पुतळ्याचे पूजन करून हार घालून व्याख्यान कार्यक्रमाला प्रारंभ करण्यात आला. पुढे शा बाबूसिंग राजपूत कलामंचाच्या वतीने महाराणा प्रताप यांचे जीवन गीत आणि महाराष्ट्र गीत सादर करण्यात आले सज्जनसिंग राजपूत युवा शाहीर विक्रांत सिंग आणि करण सिंग राजपूत यांनी सादर केलेल्या या गीताने उपस्थित लोकांचे मन जिंकले कार्यक्रमाची संचालन गजेंद्र सिंग राजपूत यांनी केले तर प्रास्ताविका प्रशांत इंगळे पाटील तर सन्मान पत्रिकेचे वाचन गजानन इंगळे यांनी केले आभार होमिओपॅथी असोसिएशनचे अध्यक्ष डॉ दुर्गा सिंग जाधव यांनी मानले कार्यक्रमाला यशस्वी बनवण्यासाठी अनेकांनी परिश्रम घेतले. यावेळी कार्यक्रमाला राजश्री शाहूचे अध्यक्ष संदीप शेळके व त्यांच्या पत्नी मालतीताई शे-ळके, पृथ्वीभाऊ राजपूत , डॉ विकास बाहेकर, शिवशाहीर जगदीशचंद्र पाटील, सार्वजनिक शिवजयंती उत्सव समितीचे माजी अध्यक्ष राजेश हेलगे, अनिलसिंग देशमुख, आदी मान्यवरासह राजपूत समाज बांधवांची मोठ्या संख्येत उपस्थिती होती

# विजेचा लपंडाव सुरू निमगाव ग्रामस्थ महावितरण विभागाला त्रस्त

**जनसचंलन/ निमगाव**



नांदुरा विद्युत वितरण अधिकाऱ्यांच्या मनमानी कारभारामुळे निमगाव येथे गेल्या अनेक दिवसांपासून विजेचा लपंडाव सतत सुरू झाला आहे. त्यामुळे जनता त्रस्त झाली आहे. वरिष्ठांनी याबाबत तत्काळ चौकशी करून संबंधितांवर कारवाई करावी, अशी मागणी जनतेतून होत आहे. गेल्या दोन ते तीन आठवड्यापासून तापमानात वाढ होत आहे. त्यातच नांदुरा विद्युत वितरण कंपनीने सतत विद्युत पुरवठा खंडित करण्याचा सपाटा गेल्या आठ दिवसांपासून लावला आहे. यामुळे जनता त्रस्त झालेली असून वाढत्या तापमानामुळे जनतेचे हाल होत आहेत. या समस्यांनी ग्रासलेल्या जनतेकडून विद्युत अधिकाऱ्यांनी सक्तीची वीज वसुली सुरू केली आहे. तर काहींचा वीजपुरवठा खंडित करण्यात आला.

*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784 Title Code-MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
त्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# शेतकऱ्यांनी पीक कर्ज नुतनीकरण करावे-जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील

**जनसंचलन/बुलडाणा**

खरीप हंगामासाठी देण्यात येणाऱ्या पिक कर्जाचे अत्यल्प वाटप करण्यात आले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी नव्याने कर्ज मिळविण्यासाठी पीक कर्जाचे नुतनीकरण करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे. जिल्हाधिकारी डॉ. पाटील यांनी पीक कर्ज वाटपाचा आढावा घेतला. यात यावर्षी पीक कर्ज वाटपाची गती नगण्य असून १ हजार ५०० कोटी रुपयांचे उद्दिष्ट आहे. मात्र अद्यापपर्यंत २४४ कोटी वितरीत झाले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी ३० जूनपूर्वी पीक कर्जाचे नूतनीकरण करून केंद्र आणि राज्य शासनाच्या व्याज सवलत योजनेचा लाभ घ्यावा. ३० जून पूर्वी पीक कर्जाचे नूतनीकरण केल्यास तीन लाख रुपयांपर्यंतच्या कर्जाला शून्य टक्के व्याज लागते. तसेच १० टक्के वाढीव कर्ज मिळत असल्याने या योजनेचा लाभ घ्यावा. पीक कर्ज नुतनीकरणामुळे खरीप पिकासाठी लागणाऱ्या खर्चास मदत होते. पीक कर्जाच्या नुतनीकरणासाठी प्रत्येक बँक शाखेमध्ये विशेष खिडकी उघडण्यात आली आहे. नुतनीकरणासाठी सात बारा, आठ अ, आधार कार्ड, रेव्हेन्यू स्टॅम्प आदी कागदपत्रे सादर करावी लागतात. पीक कर्जाचे नूतनीकरण शेतकऱ्यांना फायद्याचे असल्याने शेतकऱ्यांनी पीक कर्ज नूतनीकरण करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. पाटील यांनी केले आहे.

# लोकसभा निवडणुकीची उद्या होणार मतमोजणी

**जनसंचलन/बुलडाणा**

लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या निवडणूकीचा कार्यक्रम भारत निवडणूक आयोगाने दि. १६ मार्च २०२४ रोजी घोषित केला. त्यानुसार ५ बुलढाणा लोकसभा मतदार संघासाठी दुसऱ्या टप्प्यामध्ये दि. २६ एप्रिल २०२४ रोजी मतदान घेण्यात आले. या निवडणुकीची मतमोजणी मंगळवार, दि. ४ जून २०२४ रोजी करण्यात येणार आहे. निवडणूक आयोगाने लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ करीता दि. ४ जून २०२४ रोजी सकाळी ८ वाजता मतमोजणीस सुरवात करण्याबाबत कळविले आहे. त्यानुसार ५ बुलढाणा लोकसभा मतदारसंघाची मतमोजणी



दि. ४ जून २०२४ रोजी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, गणेश नगर, मलकापूर रोड, बुलढाणा येथे सकाळी ८ वाजता सुरू होणार आहे. या बाबतची नोंद सर्व निवडणूक लढविणारे उमेदवार, प्रतिनिधी व राजकीय पक्षांचे पदाधिकारी यांनी घेण्याचे आवाहन जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे.

# जिल्हा रुग्णालयात राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रम

**जनसंचलन/बुलढाणा**

राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रमांतर्गत जिल्हा रुग्णालयात जागतिक तंबाखू नकार दिवस साजरा करण्यात आला. उपजिल्हाधिकारी सदाशिव शेलार अध्यक्षस्थानी होते. यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून मुख्य न्यायाधीश देवेंद्र उपाध्ये उपस्थित होते. पोलिस उपअधिक्षक मेहबूब खान, अन्न व औषध प्रशासन अधिकारी श्री. वसावे, जिल्हा कृषी अधिकारी मनोजकुमार ढगे, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. सुभाष चव्हाण, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.अमोल गीते, अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. भागवत भुसारी, बाह्य संपर्क वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रवीण घोंगटे, दंत शल्य चिकित्सक डॉ. वैष्णव, जिल्हा सल्लागार तथा समुपदेशक लक्ष्मण सरकटे उपस्थित होते. प्रमुख मार्गदर्शक श्री. उपाध्ये



यांनी, कुठलेही व्यसन हे वाईट असून माणसाने चांगल्या गोष्टींचं व्यसन करावे. विद्यार्थ्यांनी अभ्यास आणि मेहनतीने ध्येय गाठावे. उपजिल्हाधिकारी श्री. शेलार यांनी, कार्यक्रमाच्या माध्यमातून लोकांपर्यंत पोहोचवून या गोष्टीचे गांभीर्य लोकांच्या लक्षात आणून द्यावे, असे आवाहन केले. कार्यक्रमाचे उद्घाटन सिग्नेचर कॅम्पियनने करण्यात आले. त्यानंतर नर्सिंग कॉलेजच्या मुलींची चित्र प्रदर्शनी दाखवण्यात आली. तसेच महिनाभरात आयोजित उपक्रमातील यशस्वी विद्यार्थ्यांना गौरविण्यात आले. गव्हर्मेंट नर्सिंग कॉलेजच्या मुलींनी तंबाखू उद्योगाच्या हस्त-क्षेपापासून मुलांचे संरक्षण यावर आधारित रांगोळी रेखाटली व पथ-नाट्य सादर केले. कार्यक्रमाला विविध स्वयंसेवी संस्थांनी पुढाकार घेतला. सामाजिक कार्यकर्ता अर्चना आराख यांनी प्रास्ताविक केले. पुनम क्षीरसागर यांनी आभार मानले.

# लैंगिक छळ करणारा शिक्षक पोलिसांच्या जाळ्यात




**जनसंचलन/बुलडाणा**

मागील महिन्यात ३ एप्रिल रोजी मोताळा तालुक्यातील एका शाळेत दोन अल्पवयीन विद्यार्थिनींचा एका शिक्षकाने लैंगिक छळ केल्याची संतापजनक घटना घडली होती. या घटनेतील पसार झालेल्या शिक्षकास तब्बल पावणेदोन महिन्यानंतर बोराखेडी पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. प्राप्त माहितीनुसार, दिलीप मोतीराम जाधव या मनोविकृत शिक्षकाने इयत्ता ४ वर्गात शिक्षण घेत असलेल्या दोन अल्पवयीन विद्यार्थिनींच्या अंगावरून वाईट उद्देशाने हात फिरवत लैंगिक छळ केला होता. दरम्यान बोरखेडी पोलिसांनी विविध कलमान्वये गुन्हा दाखल केले होते. तेव्हापासून आरोपी शिक्षक फरार होता. आता या घटनेतील पसार झालेल्या शिक्षकास तब्बल पावण-दोन महिन्यानंतर बोराखेडी पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. पुढील कार्यवाही सुरु आहे.

# अज्ञात वाहनाच्या धडकेने दुचाकीस्वाराचा मृत्यू...

**जनसंचलन/जलंब**

खामगाव येथे कामानिमित्त जाणाऱ्या जलंब येथील ३२ वर्षीय दुचाकीस्वाराला अज्ञात वाहनाने जोरदार धडक दिल्यामुळे दुचाकी स्वाराचा जागीच मृत्यू झाला असल्याची घटना १ जुन रोजी सायंकाळी ६ वाजताच्या सुमारास जलंब - खामगाव रोडवर असलेल्या शेतकरी सेवा प्रकल्पाजवळघडली. या घटनेमुळे गावात व परिसरात सर्वत्र शोक कळा पसरली होती. याबाबत वृत्त असे की जलंब ता शेगाव येथील रहिवाशी दिपक केशवराव देशमुख वय ३२ वर्ष हा त्याच्या दुचाकीने घरून कामानिमित्त खामगावकडे जात असतांना त्याच्या दुचाकीला जलंब खामगाव रोडवर असलेल्या शेतकरी सेवा प्रकल्प जवळ कोणत्यातरी अज्ञात वाहनाने जोरदार धडक दिल्याने दिपकचा जागीच मृत्यू झाला असल्याची घटना घडली. तर मृतकाच्या डोक्याला जबर मार लागल्यामुळे त्याचा जागीच मृत्यू झाला असल्याचे समजते. घडलेल्या घटनेची माहिती समजतात जलंब पोलीस व ग्रामस्थमंडळी तातडीने घटनास्थळी पोहोचले.मृतक दीपक याच्या मागे आई-वडील, पत्नी व बराच आप्त परिवार आहे. दीपक हा स्वभावाने अत्यंत चांगला व मनमिळाऊ होता. ज्या ठिकाणी अपघात घडला त्या ठिकाणी दुचाकीस्वराला धडक दिलेल्या अज्ञात वाहनाचा साईट ग्लास सुध्दा बाजूलाच रोडवर पडलेला होता. त्या साईट ग्लासवर रेडियम ने स्टार असे चिन्ह होते. सदर पडलेला साईट ग्लास हा पोलिसांनी ताब्यात घेतला असून अज्ञात वाहनाचा शोध पोलीस घेत आहेत.

# शरद पवारांना पश्चिम महाराष्ट्रातून पॉवर मिळणार, १० उमेदवारांचे काय होणार?

**वृत्तसंस्था/ मुंबई**

लोकसभा निवडणुकीच्या आधी झालेली फोडाफोडी, हातून गेलेला पक्ष, गमावलेले चिन्ह तसेच प्रमुख नेत्यांनी सोडलेली साथ अशा विपरीत परिस्थितीत ज्येष्ठ नेते शरद पवार निवडणुकांना सामोरे गेले. महाविकास आघाडी म्हणून एकत्रितपणे लढविलेल्या निवडणुकीत त्यांच्या वाट्याला १० जागा आल्या. प्रत्येक जागेवर राष्ट्रवादीच्या उमेदवारांनी निकराची लढाई केली. शरद पवार यांनीही प्रत्येक मतदारसंघात जाऊन भाजपविरोधात दंड थोपटून जनतेला साद घातली. या सगळ्याचा परिपाक मतदानोत्तर चाचण्यांमधून दिसून येतोय. लढविलेल्या १० जागांपैकी सहा ते सात जागांवर तुतारी वाजण्याची शक्यता मतदानोत्तर चाचण्यांनी वर्तवली आहे. पैकी पश्चिम महाराष्ट्रातून शरद पवार यांना सर्वाधिक बळ मिळेल, असे अंदाज वर्तविण्यात आले आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय लोकशाही आघाडीला बहुमत मिळेल, असा अंदाज बहुतांश मतदानोत्तर चाचण्यांनी व्यक्त केला केला आहे. दुसरीकडे महाराष्ट्रात मात्र याउलट स्थिती असून महायुतीला महाविकास आघाडीने तगडी टक्कर दिलेली आहे. शरद पवार, उद्धव ठाकरे आणि काँग्रेसच्या पहिल्या आणि दुसऱ्या फळीतील नेत्यांनी महाराष्ट्र पिंजून काढत सरकारविरोधी लाटेचा आणि सहानुभूतीच्या फॅक्टरचा पुरेपूर वापर करून निवडणुकीत रंगत आणली. पश्चिम महाराष्ट्र हा साखर पट्टा म्हणून ओळखला जातो. इथे दूधसंघ, सूतगिरण्यांचा देखील राजकारणावर मोठा प्रभाव पडतो. या संस्था टिकवायच्या असतील तर सरकारचे पाठबळ असणे महत्त्वाचे असते. त्याचमुळे ज्या पश्चिम महाराष्ट्रात एकेकाळी राष्ट्रवादीचा बोलबोला होता, तिथे भाजपचा शिरकाव झाल्यानंतर महत्त्वाच्या नेत्यांनी सत्ताधाऱ्यांसोबत जाणे पसंत केले. परंतु या निवडणुकीत शरद पवार यांनी राजकीय डाव टाकून चाणाक्षपणे बेरजेचे राजकारण केले. त्याचाच परिणाम म्हणून मतदानोत्तर चाचण्यांमधून पश्चिम महाराष्ट्र हा शरद पवार यांना साथ देईल, असे अंदाज वर्तविण्यात येत आहे.बारामती, शिरूर, माढा, सातारा, अहमदनगर दक्षिण, बीड, दिंडोरी, रावेर, भिवंडी आणि वर्धा या जागा महाविकास



आघाडीच्या जागावाटपात शरद पवार यांच्या वाट्याला आल्या. या जागांवरील अनुक्रमे सुप्रिया सुळे, अमोल कोल्हे, धैर्यशील मोहिते पाटील, शशिकांत शिंदे, नीलेश लंके लोकसभेच्या निवडणूक निकालानंतर गुलाल उधळतील, असे साधारण अंदाज आहेत.

## धानुका कंपाऊंड मध्ये चोरी ५२ हजाराचा मुद्देमाल लंपास

**जनसचंलन/शेगाव**

येथील धानुका कंपाऊंड मध्ये अज्ञात चोरट्यांनी प्रवेश करून घराचे कुलुप कोंडे तोडून ५२ हजाराचा मुद्देमाल लंपास केल्याची घटना घडली. याबाबत मनोज जुगलकीशोर सराफ वय ५५ वर्ष यांनी पोलिसात फिर्याद दिली की, आम्ही बाहेर गावी देव दर्शना करीता गेले असता कोणीतरी अज्ञात चोरटयाने घरात प्रवेश करुन घराचे कुलूप तोडुन नगदी चार हजार रुपये व १० ग्रॅम वजनाचे ५ चांदीचे शिक्के एकुण ५० ग्रॅम किंमती अंदाजे २५०० रुपये तसेच देव घरातील चांदीची गणपतीची मुर्ती वजन १५० ग्रॅम किंमती अंदाजे ७ हजार ५०० रु, चांदीची कृष्णाची मुर्ती वजन १२५ ग्रॅम किंमती ६ हजार २५० रु., चांदीची महालक्ष्मीची मुर्ती वजन ३०० ग्रॅम किंमती अंदाजे १५ हजार रु., चांदीचे शिवलींग वजन २५० ग्रॅम किमती अंदाजे १ २ हजार ५०० रु., चांदीची कुलदेवीची मुर्ती वजन ३५ ग्रॅम किंमती अंदाजे १ हजार ७५० रु., चांदीचा गळवा वजन २५ ग्रॅम किंमती अंदाजे १ हजार २५० रु., चांदीचा छोटा ग्लास वजन २० ग्रॅम किंमती अंदाजे १ हजार रु., चांदीच्या दोन छोटया वाटया वजन २० ग्रॅम किंमती अंदाजे १ हजार रु. असा एकुण ९७५ ग्रॅम चांदीचा मुद्देमाल कि ४८ हजार ७५० व नगदी ४ हजार रु असा एकुण ५२ हजार ७५० रु. चा माल लंपास केला आहे. अशा तक्रारी वरून अज्ञात आरोपी विरुद्ध कलम ४५४,४५७, ३८० भादंवि नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## मलकापूर पोलिस ठाण्यात पोलिसांच्या झाडाझडतीने बस प्रवाशांना मनस्ताप

**जनसंचलन/मलकापूर**

मोबाइल चोरीला गेल्याने एसटीत चढलेल्या तरुणीने आकांडतांडव केले. त्यामुळे धावती बस पोलिस ठाण्यात वळती करण्यात आली. त्याठिकाणी पोलिसांच्या झाडाझडतीने असंख्य प्रवाशांना मनस्ताप सहन करावा लागल्याची घटना शनिवारी सकाळी घडली. याशिवाय तब्बल पाऊण तास एसटीचा खोळंबा झाल्याने एकच खळबळ उडाली. राज्य परिवहन महामंडळाची बस क्रमांक एमएच-०४, एस-८१९४ ही मलकापूर आगारातून खान्देशातील कुऱ्हा गावाकडे निघाली. शहरातील तहसील चौकात पहिल्या थांब्यावर शनिवारी सकाळी ११ वाजताच्या सुमारास नम्रता निनाजी शिंगोटे ही तरुणी चढली. रेल्वे पुलाखालून मुक्ताईनगर रस्त्यावर पुढे जात असतानाच त्या तरुणीने तिच्या जवळचा मोबाइल गायब झाल्याचा आरडाओरडा करत आकांडतांडव केले. डॉ. व्ही. बी. कोलते अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या थांब्यावर गाडी थांबवून वाहक दीपक भीमराव लोखंडे यांनी नम्रता शिंगोटे हिची विचारपूस केली. त्यांनी संबंधित नंबरवर फोन लावला, तो रिसिव्ह झाला नाही. मग त्यांनी तरुणीची समजून काढण्याचा प्रयत्न केला. मात्र, ती ऐकायलाही तयार नसल्याने वाहकाने एसटी पोलिस ठाण्यात वळविण्याचे चालकाला सांगितले. पोलिस ठाण्यात एसटीतील ५० ते ५५ आबालवृद्ध प्रवाशांची डीबी पथकाने झाडाझडती घेतली. परंतु, मोबाइल आढळून आला नाही. त्यानंतर पोलिसांनी दमदाटी देखील केली. तब्बल ३० मिनिटांच्या झाडाझडती नंतर एसटीच्या नोंदी घेण्यात आल्या. निर्धारित मार्गावर एसटी रवाना झाली. यात प्रवाशांना मात्र अनाठायी मनस्ताप सहन करावा लागला. त्यातल्या त्यात कुठल्याही प्रकारची चूक नसताना एसटीचा तब्बल पाऊण तास खोळंबा झाला.

## कर्जापाई शेतकऱ्याने गळफास घेउन केली आत्महत्या

**जनसंचलन/ चिखली**

चिखली तालुक्यातील मेरा बुद्रुक येथील शंकर झुंगाजी डोंगरदिवे वय ६६ वर्ष यांनी आज सकाळी दिनांक ०२ जुन २०२४ रोजी त्यांच्या शेताशेजारील अशोक नारायण पडघान गट नंबर १६८ यांच्या धुऱ्यावरील रामफळ या झाडाच्या दक्षिणेकडील फांदीला दोरीच्या साह्याने गळफास घेऊन आत्महत्या केली आहे. त्यांच्याकडे सामायिक क्षेत्रामध्ये गट नंबर २१० व २१३ मध्ये दोन एकर नऊ गुंठे जमीन आहे. सततची नापिकी, मालाचे पडलेले भाव, यांत्रिकी शेती झाल्यामुळे शेतीचा खर्च वजा जाता बाकी काही राहत नाही. त्यामुळे त्यांचे आर्थिक परिस्थिती ढासळलेली होती. आता समोर पेरणीचे दिवस आले असताना आणखीन शेतीला खर्च कुठून लावायचा ,आर्थिक तडजोड कशी करायची या विवंचनेत ते होते. घटनेची माहिती मिळताच महसूल विभागाचे कर्मचारी कोतवाल सचिन पडघान व मेरा बुद्रुक पोलीस पाटील बद्री पडघान यांनी अंढेरा पोलीस स्टेशनला माहिती दिली. माहिती मिळताच अंढेरा पोलीस स्टेशनचे कर्मचारी अमलदार गणेश देढे व वायाळ यांनी



घटनास्थळी येऊन पंचा समक्ष पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी चिखली येथे सरकारी दवाखान्यात पाठवण्यात आला. आत्महत्याग्रस्त शेतकरी शंकर झुंगाजी डोंगरदिवे यांच्या पश्चात त्यांची पत्नी एक मुलगा आणि दोन मुली असा परिवार आहे.

## चक्कर येऊन पडल्याने एकाचा मृत्यू

**जनसंचलन/ खामगाव**

रस्त्याने पायी जाताना चक्कर येऊन पडल्याने एका ५६ वर्षीय व्यक्तीचा मृत्यू झाला. ही घटना शुक्रवारी सायंकाळी जलंब-वाडी रस्त्यावरील शासकीय तंत्र निकेतन समोर घडली. दादाराव राजाराम गवई (रा. वाडी) असे मृत व्यक्तीचे नाव आहे. घटनेनंतर त्यांना तातडीने खामगाव येथील सामान्य रुग्णालयात



हलविण्यात आले. तेथे डॉक्टरांनी तपासणीअंती त्यांना मृत घोषित केले.